महाराष्ट्र शासन
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
राज्य उत्पादन शुल्क भवन, महानगरपालिका सभागृह मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
Email: jcam.excise@maharashtra.gov.in

4
24/02/2025

वाचा : १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डीएनएस २१९३/१५९५९/अकरा, दि.१५.०७.२००४
२. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डीवायएस ११२०१६/९२९९-ए/चार (भाग-२), दि.२२.११.२०२२
३. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डीवायएस ११२०१६/९२९९-ए/चार (भाग-२), दि.३०.११.२०२२
४. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डीवायएस ११२०२४/आसवनी नि./चार,दि.२९.०४.२०२४.
५. मा.आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे दि.२८.०८.२०२४ रोजी झालेल्या विप्रकृत मद्यार्काच्या समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.
६. मा.आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे दि.१०.१२.२०२४ रोजी झालेल्या विप्रकृत मद्यार्काच्या समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.
७. मा. उप मुख्यमंत्री महोदयांकडे राज्यातील साखर उद्योगाशी निगडीत महत्वाच्या प्रश्नांबाबत दि.०४.०२.२०२५ रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

**विषय** : वाहनाच्या इंधनात मिश्रणासाठी वापरण्यात येणाऱ्या इथेनॉलचे विप्रकृतीकरण करतांना वापरावयाच्या विप्रकृत पदार्थाबाबत...

## परिपत्रक

क्रमांक. डीवायएस ११२०१६/९२९९-ए/चार (भाग-२) मुंबई.दि. १८ फेब्रुवारी.२०२५.

उपरोक्त वाचले क्र. २ अनुसार साधारण / विशेष विप्रकृत मद्यार्क बनवितांना वापरावयाच्या विप्रकृत पदार्थांचे प्रमाण विहित करण्यात आलेले आहे. या प्रमाणानुसार वेगवेगळे घटक आवश्यक ते विप्रकृत पदार्थ वापरून त्यापासून विप्रकृत मद्यार्क तयार करून त्यांचा वापर किंवा विक्री करतात. तसेच उपरोक्त वाचले अ.क्र.१ मध्ये वाहनाच्या इंधनामध्ये वापरावयाच्या विप्रकृत पदार्थांचे प्रमाण विहित केलेले आहे. वाचले अ.क्र.७ वरील बैठकीतील मुद्दा क्र.२ मध्ये इथेनॉलमध्ये वापरण्यात येणारे क्रोटोनाल्डिहाईड (Crotonaldehyde) हा विप्रकृत पदार्थ आर्थिकदृष्टया परवडणारा नसून तो आरोग्यास हानिकारक असल्याने त्यास पर्यायी विप्रकृत पदार्थ सुचवावेत व त्याची अंमलबजावणी करावी, असे निर्देश प्राप्त झाले आहेत. याबाबत यापूर्वीच दि.२८.०८.२०२४ रोजी आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत तज्ञ समितीच्या बैठकीमध्ये अशा प्रकारची मागणी करण्यात आली होती. त्याअनुसरून बैठकीतील तज्ञ सदस्यांना याबाबत वाहनाच्या इंधनात मिश्रणासाठी वापरण्यात येणाऱ्या इथेनॉलच्या विप्रकृतीकरणासाठी वापरण्यात येणाऱ्या पर्यायी विप्रकृत पदार्थांची नावे सुचविण्याबाबत कळविण्यात आले होते. याबाबत समितीच्या तज्ञ सदस्यांकडून पर्यायी विप्रकृत पदार्थांबाबत अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर दि.१०.१२.२०२४ रोजी आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत तज्ञ समितीची पुन:श्च बैठक झाली. सदर बैठकीमध्ये तज्ञ समितीने सुचविलेले पर्यायी विप्रकृत पदार्थ हे वाहनाच्या इंधनामध्ये मिश्रण करण्यात येणाऱ्या

इथेनॉलशी सुसंगत असून ते ज्वलनामध्ये कुठलाही अडथळा निर्माण करत नाहीत. त्यामुळे या विप्रकृत पदार्थांचा वापर वाहनाच्या इंधनात मिश्रणासाठी वापरण्यात येणाऱ्या इथेनॉलच्या विप्रकृतीकरणासाठी करण्याबाबत समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार इथेनॉलमध्ये क्रोटोनाल्डिहाईड (Crotonaldehyde) ०.२% अधिक कडू पदार्थ याऐवजी खालीलप्रमाणे विप्रकृत पदार्थांचा वापर करण्यात यावा.

| अ.क्र. | विप्रकृत पदार्थ | प्रमाण ( रंग व कडू पदार्थ न वापरता ) | प्रमाण (कडू पदार्थासह ) |
|---|---|---|---|
| १ | Acetone | ५% | ०.५% |
| २ | Methyl ethyl ketone (MEK) | ५% | ०.५% |
| ३ | Ethyle Acetate | ५% | १% |

उपरोक्त प्रमाणे सर्व घटकांनी इथेनॉलच्या मिश्रणामध्ये वापरावयाचे विप्रकृत पदार्थांमध्ये वरीलपैकी कोणत्याही एका पदार्थाचा विहित केलेल्या प्रमाणानुसार वापर करावा. **क्रोटोनाल्डिहाईड (Crotonaldehyde) ०.२% या विप्रकृत पदार्थाच्या वापरास यापुढे परवानगी असणार नाही. तसेच ज्या घटकांनी क्रोटोनाल्डिहाईड (Crotonaldehyde) ०.२% या विप्रकृत पदार्थाचा वापर करून विशेष विप्रकृत मद्यार्क तयार करण्यास किंवा वापरण्यास सवलत घेतलेली आहे ती सवलत देखील लागू असणार नाही.**

विप्रकृत मद्यार्क व जलरहीत विप्रकृत मद्यार्क (इथेनॉल) निर्मिती करणारे सर्व घटक, विप्रकृतीकरण करण्याऱ्या पदार्थांचे उत्पादन करणाऱ्या ज्या घटकांकडून अशा पदार्थांची खरेदी करणार आहेत, अशा घटकांचा तपशील खालीलप्रमाणे प्रभारी अधिकारी यांचेकडे सादर करतील. प्रभारी अधिकारी या तपशीलासह संपूर्ण माहिती अधीक्षकांमार्फत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करतील. सदर माहिती आयुक्त कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर यासंबंधित उत्पादने विकत घेण्यास व वापरण्यास परवानगी राहील.

**(अ) विप्रकृतीकरण पदार्थनिर्मिती करणाऱ्या घटकांचा सादर करावयाचा तपशील :**

१. घटकाचा विनंती अर्ज
२. घटकाच्या उत्पादनाचा तपशील व सदर उत्पादनाच्या मान्यतेबाबत सक्षम प्राधिकारणाचे प्रमाणपत्र.
३. घटकाचा पत्ता, पॅन कार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, कंपनी नोंदणी प्रमाणपत्र, कारखाना अनुज्ञप्ती.
४. संचालकांचा तपशील नाव, पत्ता, आधार कार्ड व पॅन कार्ड इ.
५. उत्पादित विप्रकृत पदार्थाच्या विश्लेषणाबाबत रासायनिक विश्लेषक ( मे. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (VSI) पुणे किंवा हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, मुंबई ) यांचेकडून प्राप्त शुद्धता अहवाल.

**(ब) विप्रकृतीकरण पदार्थांची अधिकृत विक्रेता म्हणून विक्री करणाऱ्या घटकांचा सादर करावयाचा तपशील :**

१. घटकाचा विनंती अर्ज
२. विप्रकृतीकरण पदार्थांची निर्मिती करणाऱ्या घटकाकडून अधिकृत पुरवठादार म्हणून प्राप्त प्रमाणपत्र

३. घटकाचा पत्ता, पॅन कार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, कंपनी नोंदणी प्रमाणपत्र, कारखाना अनुज्ञप्ती,
४. संचालकांचा तपशील नाव, पत्ता, आधार कार्ड व पॅन कार्ड इ.
५. उत्पादित विप्रकृत पदार्थाच्या विश्लेषणाबाबत रासायनिक विश्लेषक ( मे. वसंतदादा शुगर इंन्स्टिट्युट (VSI) पुणे किंवा हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, मुंबई ) यांचेकडून प्राप्त शुद्धता अहवाल.

उपरोक्त प्रमाणे विप्रकृतीकरण पदार्थांची निर्मिती करणाऱ्या घटकांची नोंदणी ही एकवेळ प्रक्रिया असून अशा घटकांची नोंदणी झाल्यानंतर त्यांच्याकडून विप्रकृतीकरण पदार्थ घेता येतील. अश्या प्रकारची नोंदणी ही कोणत्याही प्रकारची अनुज्ञप्ती नसून ती केवळ माहितीस्तव केलेली प्रक्रिया आहे.

उपरोक्त वाचले क्र.४ अन्वये डिनेचरंट निर्माता / विक्रेता यांच्याकडून विप्रकृत पदार्थ प्राप्त करून घेताना डीएस-१ अनुज्ञप्तीधारकांनी घ्यावयाच्या दक्षता व मद्यार्क विप्रकृत करण्याकरीता अनुज्ञप्तीमध्ये विप्रकृत पदार्थ प्राप्त झाल्यावर डीएस-१ अनुज्ञप्तीधारकाने घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्या सुचनांचे तंतोतंत पालन, मद्यार्क विप्रकृत करतांना करण्यात यावे.

( डॉ. विजय सूर्यवंशी )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
२. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
३. सर्व निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (मार्फत- संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क)
४. सर्व आसवनी प्रभारी अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क
५. सर्व नमुना-I व डीएस-१ अनुज्ञप्तीधारक ( मार्फत- संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क )

सर्व अधीक्षकांना सुचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व निरीक्षक, आसवनी वरील प्रभारी अधिकारी, सर्व नमुना-I व डीएस-१ अनुज्ञप्तीधारक व सर्व वापरकर्ते उद्योग यांच्या निदर्शनास आणावेत.

प्रत,

१. कार्यासन क्र. ५,९ व ११ आयुक्तालय,
२. अभिलेख शाखा (५ प्रती )
३. कार्यासन क्र.८ ( या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याकरीता )

( विश्वनाथ इंदिसे )
सह आयुक्त,( मळी व मद्यार्क )
राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.